**नगरपरिषदा विहित दराने एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केली नसल्यास करमणुक कर अनुदानामध्ये कपात करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**शासन परिपत्रक क्र. जोईएन १०९४/३०५७/प्र.क्र. ३३८(९४)/नवि-१६**
**दि. : ५ डिसेंबर, १९९६**

संदर्भ :- (१) शासन निर्णय, नगर विकास व आरोग्य विभाग क्र.एमयुएन ११७५/३०१३५(१)/एमयुएन-२, दि. १.८.१९७५.
(२) शासन परिपत्रक, नगर विकास व आरोग्य विभाग क्र. : जीएनटी-१०९२/३२३६/युडी -१०, दि. ८.९.१९८२
(३) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, क्र. एमयुजी - १०८९/१२८८/सीआर-४१/नवि-३१ दि. १.४.१९९२
(४) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. एमयुजी १०९३/सीआर-८७/९३/नवि-३२, दि. २४.३.१९९४

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपरिषदांना शासनाकडून १९७५-७६ पासून, त्यांच्या हद्दीत आदल्या वर्षी गोळा झालेल्या करमणुक कराच्या रकमेवर आधारीत खालीलप्रमाणे अनुदान देण्यांत येते :-

"अ" वर्ग नगरपरिषदा - ३० टक्के
"ब" वर्ग नगरपरिषदा - ३५ टक्के
"क" वर्ग नगरपरिषदा - ४० टक्के

शासन परिपत्रक, नगर विकास व आरोग्य विभाग क्र. जीएनटी-१०८२/३२३६/युडी-१०, दि. ८.९.१९८२ नुसार, नगरपरिषदांनी विहित कमाल दरापेक्षा एक टक्का कमी दराने एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केल्यास वरीलप्रमाणे अनुदान देण्यांत येत असे. तसेच विहित कमाल दराच्या दोन टक्क्यापेक्षा कमी दराने एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केल्यास नगरपरिषदांना देण्यांत येणाऱ्या करमणुक कर अनुदानात विहित प्रमाणात कपात करण्यांत यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. एमयुजी-१०८९/१२८८/सीआर-४१/९१/नवि-३२, दि.१.४.१९९२ व क्र. एमयुजी १०९३/सीआर-८७/९३/नवि-३२, दि. २४.३.१९९४ अन्वये नगरपरिषदांनी आकारावयाच्या एकत्रित मालमत्ता दराच्या किमान व कमाल दरामध्ये वाढ करण्यांत आली आहे. परिणामत: शासन परिपत्रक, नगर विकास व आरोग्य विभाग क्र. जीएनटी-१०८२/३२३६/युडी-१०, दि. ८.९.१९८२ मधील सूचना सुधारित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन परिपत्रक : शासनाचे दि. १.४.१९९४ पासून विहित केलेले एकत्रित मालमत्ता कराचे कमाल व किमान दर लक्षात घेता, शासन परिपत्रक, नगर विकास व आरोग्य विभाग क्र. जीएनटी-१०८२/३२३६/युडी-१०, दि. ८.९.८२ मधील सूचना अधिक्रमित करून सन १९९४-९५ पासून नगरपरिषदांना करमणूक कर अनुदानाचे वाटप खालील दराने करण्यांत यावे असे शासनाचे आदेश आहेत:-

| एकत्रित मालमत्ता कर निर्धारणाची टक्केवारी | | | करमणुक कर अनुदानाच्या वितरणाचे प्रमाण |
|---|---|---|---|
| "अ" वर्ग नगरपरिषद | "ब" वर्ग नगरपरिषद | "क" वर्ग नगरपरिषद | |
| २८ | २७ | २६ | १०० टक्के |
| २७ | २६ | २५ | १०० टक्के |
| २६ | २५ | २४ | ९० टक्के |
| २५ | २४ | २३ | ८० टक्के |
| २४ किंवा त्यापेक्षा कमी | २३ किंवा त्यापेक्षा कमी | २२ किंवा त्यापेक्षा कमी | ५० टक्के |

नगरपरिषदांना चालू आर्थिक वर्षात वरीलप्रमाणे अनुदान मंजूर करतांना १९९४-९५ व १९९५-९६ या वर्षात देय असलेल्या अनुदानाचे समायोजन करावे.

०२. या आदेशाची अंमलबजावणी संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई व संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ. मा. पवार)
महाराष्ट्र शासनाचे सह सचिव

प्रति,
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती)